वर्ष : ०५ | अंक: १९ | मुंबई, मंगळवार २ एप्रिल २०१९ ते ८ एप्रिल २०१९ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 निष्ठावंत नेत्यांमुळे पुण्याची उमेदवारी लटकली

3 → भाजप आणि काँग्रेसची रणनीती

देशात सध्या एकच नाव, मोदी मोदी मोदी ← 4

# घर खरेदी, कर्ज घेणे होणार स्वस्त

# वाहन अन् सिलिंडरच्या किमती भडकणार!

## PAN CARD च्या नियमांमध्ये सरकारने केले मोठे बदल




**नवी दिल्ली- नव्या आर्थिक वर्षात नवनव्या आर्थिक बदलांना जनतेला सामोरं जावं लागणार आहे. अर्थसंकल्पातील तरतुदी आणि जीएसटी समितीनं घेतलेल्या निर्णयांची १ एप्रिलपासून अंमलबजावणी होणार आहे. घर खरेदी करणं स्वस्त होणार असलं तरी वाहन चालवणं अन् घरगुती सिलिंडर महागणार आहे. प्राप्तिकर विभागानं पॅन कार्डाच्या नियमांत तीन मोठे बदल केले आहेत. आर्थिक व्यवहारांसाठीचे ओळखपत्र म्हणून काळोखाला जाणाऱ्या पॅन कार्डात प्राप्तीकर विभागाने तीन मोठे बदल केले आहेत. येत्या एक एप्रिलपासून हे बदल लागू होणार आहेत. पॅन कार्डातील महत्वपूर्ण बदल पुढीलप्रमाणे: १) आयटी कलम १३९ (ए) अंतर्गत पॅन कार्ड आधार कार्डाला जोडणे आवश्यक आहे अन्यथा ते निष्क्रिय समजले जाईल. २) यापुढे एका आर्थिक वर्षात (१ एप्रिल ते ३१ मार्च) २.५ लाखाहून अधिकची पैशांची उलाढाल/व्यवहार करायची असल्यास असल्यास पॅन कार्ड काढणे गरजेचे आहे. ३) नव्या पॅन कार्डवर छायाचित्र, स्वाक्षरी, होलोग्राम आणि क्यूआर कोडची जागा बदलण्यात आली आहे. तो आता ई-पॅनमध्येही मिळेल. हा क्यूआर कोड विशेष भ्रमणध्वनी ॲपच्या माध्यमातून स्कॅन करता येईल.**

**घर खरेदी करणाऱ्यांना फायदा:** आता नवीन आर्थिक वर्षात जीएसटी परिषदेच्या निर्णयानुसार जीएसटीचे नवे दर लागू होणार आहेत. यानुसार घर खरेदी करताना घराचे अथवा फ्लॅटचे काम सुरु असल्यास त्यावर १२ टक्क्यांऐवजी ५ टक्के जीएसटी लागणार आहे. त्यामुळे घरांच्या किंमती कमी होण्याची शक्यता असून याचा थेट फायदा घर खरेदी करणाऱ्यांना मिळणार आहे. तसेच एक एप्रिल २०१९पासून बांधण्यात येणाऱ्या घरांवर विकासक आणि बांधकाम व्यावसायिकांना जीएसटीचे दोन पर्याय असणार आहेत.

**करमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ:** केंद्र सरकारने एक फेब्रुवारी २०१९ रोजी सादर केलेल्या हंगामी अर्थसंकल्पात वार्षिक पाच लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे ज्यांचे वार्षिक उत्पन्न पाच लाख किंवा त्यापेक्षा कमी असेल त्यांना उत्पन्नवार प्राप्तिकर भरावा लागणार नाही. शिवाय अर्थसंकल्पात स्टँडर्ड डिडक्शन संबंधित देखील घोषणा करण्यात आली होती.

उर्वरित पृष्ठ 2 वर




## राजीनामे मंजूर, आमदारांच्या राजीनाम्यामुळे शिवसेनेचे संख्याबळ घटले

**मुंबई-** विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देऊन लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या हर्षवर्धन जाधव, प्रताप पाटील चिखलीकर व सुरेश ऊर्फ बाळू धानोरकर या तीन बंडखोर आमदारांमुळे शिवसेनेचे विधानसभेतील संख्याबळ ६३ वरून ६० वर आले आहे. भाजप-शिवसेना युतीमुळे नाराज झाल्याने वरोरा-भद्रावतीचे शिवसेना आमदार सुरेश धानोरकर यांनी आमदारकीचा राजीनामा दिला असून ते काँग्रेसच्या तिकीटावर चंद्रपूर मतदारसंघातून रिंगणात उतरले आहेत. भाजपकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर यांना टीकेचे लक्ष्य बनविले होते, तेव्हापासून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार हे



धानोरकर यांच्या संपर्कात होते. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातील वरोरा, चंद्रपूर, राजुरा, वणी व आर्णी हे पाच विधानसभा मतदारसंघ कुणबीबहुल आहेत. काँग्रेसलाही कुणबी समाजाचा युवा चेहरा हवा होता. त्यामुळे त्यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. कन्नडचे शिवसेनेचे आमदार हर्षवर्धन जाधव यांनीही बंडाचा झेंडा फडकावला असून ते औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेचे खासदार चंद्रकांत खैरे यांच्या विरोधात अपक्ष म्हणून निवडणूक लढवित आहेत. जाधव यांच्या बंडखोरीमुळे खैरे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. मराठा आरक्षणासाठी आत्मदहन करणाऱ्या काकासाहेब शिंदेंबाबत सहानुभूती व्यक्त करत जाधव यांनी यापूर्वीही राजीनामा दिला होता. मात्र तो मंजूर झाला नव्हता.

उर्वरित पृष्ठ 2 वर

## घारे ज्वेलर्सची उत्तुंग भरारी

### नालासोपारा येथे केले नवीन सोन्या चांदीच्या शोरूमचे उद्घाटन





**नालासोपारा-** कोण म्हणतो मराठी माणूस मागे आहे. ८५ वर्षे सतत ग्राहकांच्या गळयातील ताईत बनलेले पिढयानपिढया व्यवसायात नवनवीन आकर्षक मन मोहून टाकणारे दागिने उपलब्ध करुन देणारे घारे ज्वेलर्स यांच्या ९ व्या शोरुमचे उद्घाटन नालासोपारा येथे धुमधडाक्यात करण्यात आले. यावेळी जसे घारे ज्वेलर्स पिढया नपिढया व्यवसाय करतात तसेच ग्राहक ही पिढयानपिढया एकाच सोन्या चांदीच्या दुकानात जाऊन आपले दागिने खरेदी करताना दिसतात. परळ, कांदीवली, गोरेगाव, विरार, भांडूप, बोरिवली, मिरा रोड, डोंबिवली असे वेगवेगळया ठिकाणी शोरुम बनवून आता नालासोपारा या विभागात अनेक परप्रांतीय ज्वेलर्स ला टक्कर देण्यासाठी मराठमोळया दागिन्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या घारे ज्वेलर्स च्या नवीन पेढीचे उद्घाटन करण्यात आले.

या शोरुमचे उद्घाटनास विविध क्षेत्रात कामगिरी बजावलेल्या मोठमोठया मंडळीनी उपस्थिती दर्शवली त्याचप्रमाणे पोलिस बातमी पत्रचे संपादक दिपक मोरेश्वर नाईक आणि मानवाधिकार बातमीच्या संपादिका सौ. प्रिती दिपक नाईक यांनी शोरुमला भेट देऊन श्री. उदय घारे यांचे अभिनंदन केले. एक मराठी माणूस व्यवसायात ८५ वर्षे ग्राहकांचा विश्वास संपादन करुन आपले प्रत्येक मराठी वस्तीमध्ये शोरुम निर्माण करतो याचा अभिमान वाटतो असे उद्गार संपादक दिपक मोरेश्वर नाईक यांनी काढले.

## निवडणूकाकाळात तीन दिवस 'ड्राय डे'


**मुंबई - लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची वेळ संपण्याच्या ४८ तास आधीपासून ते मतदानाची वेळ संपेपर्यंत तसेच मतमोजणीच्या दिवशी देशी, विदेशी दारू अथवा ताडीसारखे मद्यसदृश्य पदार्थ यांची विक्री करण्यास कायद्याने बंदी घालण्यात आली आहे. १९५१च्या लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम १३५ (सी) नुसार ही मनाई करण्यात आली असून, संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी ते दिवस 'ड्राय डे' म्हणजेच 'कोरडा दिवस' म्हणून जाहीर करावे, असे निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत देण्यात आले आहेत.**

निवडणुका खुल्या, मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक काळात मद्यविक्री करण्यास मनाई करण्यात येते. तसेच मतदानापूर्वीचे ४८ तास आणि मतमोजणीच्या दिवसाचे २४ तास मद्यविक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विदेशी मद्य, देशी दारू, ताडी दुकाने यांना हा आदेश लागू असून त्याचे उल्लंघन करणाऱ्यांचा परवाना रद्द करण्यात येईल, तसेच त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येईल.



मतदान व मतमोजणी या काळात तीन दिवस 'ड्राय डे' जाहीर करण्याची संबंधित कायद्यात तरतूद आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीसाठी ४८ मतदारसंघांमध्ये एकूण ४ टप्प्यात मतदान प्रक्रिया होणार आहे. ११ एप्रिल २०१९ रोजी ७ मतदारसंघासाठी, १८ एप्रिल रोजी १० मतदारसंघासाठी, २३ एप्रिल रोजी १४ मतदारसंघासाठी आणि २९ एप्रिल रोजी १७ मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. मतमोजणी २३ मे २०१९ रोजी होणार आहे.

## वादळी वारा आणि पावसामुळे फळबागा जमीनदोस्त



**सोलापूर-** सोलापूर शहर आणि जिल्ह्यात मध्यरात्री झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधीचे नुकसान झालेय. ऐन काढणीला आलेल्या द्राक्ष बागा आणि डाळिंबीच्या बागांचे या वादळी वारा आणि पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याशिवाय जिल्ह्यातील शेकडो एकर जमिनीवरील फळबागांसह इतर पिकेही जमीनदोस्त झालीयेत.

मोहोळ तालुक्यातील राजेश जगताप या शेतकऱ्याची साडेतीन एकराची द्राक्षबाग जमीनदोस्त झाली आहे. यामुळे जगताप यांचे तब्बल २५ ते २६ लाखांचे नुकसान झालेय.

## पुलवामा हल्लाप्रकरणी पुण्यात एकाला अटक


**पुणे-** ४० जवानांचे प्राण घेणाऱ्या पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्याप्रकरणी बिहारच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) गुरुवारी पुण्याच्या चाकण भागातून एका संशयिताला ताब्यात घेतले आहे. काश्मीरमधील पुलवामा येथे १४ फेब्रुवारी रोजी एका आत्मघातकी अतिरेक्याने केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या ताफ्यावर स्फोटकांनी भरलेले वाहन घुसवीत त्या वाहनाचा स्फोट घडवला होता. त्यात ४० जवान शहीद झाले होते. देशाचा गुप्तचर विभाग आणि संरक्षण सज्जतेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या या हल्ल्याने अवघा देश हादरला होता. या हल्ल्याप्रकरणी महाराष्ट्रात झालेली ही पहिली कारवाई आहे. या हल्ल्याचा छडा लावताना बिहारच्या एटीएसने पाटणा येथून खैरुल मंडल आणि आबू सुल्तान या दोन संशयितांना ताब्यात घेतले होते. त्यांची कसून चौकशी करण्यात आली तेव्हा त्यांच्याकडून



लष्कराबाबत महत्त्वाचा तपशील असलेली कागदपत्रे हस्तगत झाली होती. हे दोघे बांगला देशातील 'जमात उल मुजाहिदीन बांगला देश' (जेएमबी) आणि 'इस्लामिक स्टेट ऑफ बांगला देश' (आयएसबीडी) या बंदी घातलेल्या संघटनांचे हस्तक असल्याचेही उघड झाले होते. या दोघांच्या चौकशीतूनच चाकण येथील त्यांचा साथीदार शरियत मंडल (वय १९, मूळ रा. पश्चिम बंगाल) याचे नाव पुढे आले होते. शरियत मंडल हा पिंपरीजवळील चाकण परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती बिहार 'एटीएस'च्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार बिहार 'एटीएस'चे पथक चाकण परिसरात आले. त्यांनी पुणे 'एटीएस'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ही माहिती दिली. मंडल याच्या हालचालीवर पाळत ठेवून त्याला गुरुवारी ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर पुणे न्यायालयातून परवानगी घेऊन त्याला 'ट्रान्झिट रिमांड' मिळवून पाटण्याला नेण्यात आले. मंडल याच्याकडून काही कागदपत्रे हस्तगत करण्यात आली आहेत. मात्र, याबाबतची अधिकृत माहिती मिळू शकली नाही. चाकण पोलिसांना या कारवाईबाबतची माहिती देण्यात आली नव्हती. ङ पुलवामा हल्ल्याचा छडा लावताना बिहारच्या एटीएसने पाटणा येथून खैरुल मंडल आणि आबू सुल्तान या दोन संशयितांना ताब्यात घेतले होते.

# वंचितांची आघाडी म्हणजे निवडणुकीपुरत्या उगवलेल्या छत्र्या

**मुंबई-** राज्यात निवडणुकीचा रणसंग्राम आता सुरु झाला आहे. युतीबरोबरच आघाडीनेही आपल्या प्रचाराचे नारळ फोडले आहेत. दरम्यान, कोल्हापूरातील युतीच्या पहिल्याच प्रचार सभेला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीबरोबरच वंचित बहुजन आघाडीलाही त्यांनी टार्गेट केले. वंचितांची आघाडी म्हणजे निवडणुकीपुरत्या उगवलेल्या छत्र्या आहेत, असे त्यांनी म्हटले आहे. शिवसेनेच्या मुखपत्रातून उद्धव ठाकरे विरोधकांवर बरसले आहेत. उद्धव ठाकरे अग्रलेखात म्हणतात, काँग्रेस-राष्ट्रवादीला सध्या घरघर लागली आहे. शिवसेना-भाजपा युती होत नाही हे गृहीत धरुन त्यांनी अनेक घोषणा केल्या केल्या त्यांचे सत्तावाटपही सुरु झाले. मात्र, युतीची घोषणा होताच या दोघांचेही अवसान गळाले आहे. त्यांच्या कमरेवरच्या नाड्याही ढिल्या पडल्या



आहेत त्यांचे उमेदवार निवडणूक सोडून मैदान सोडून पळू लागले आहेत. त्यामुळे विरोधक कोणी आहेत का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. वंचितांच्या आघाडीबाबत तर न बोललेलेच बरे, या निवडणुकांपुरत्या निर्माण झालेल्या छत्र्या आहेत. निकालानंतर त्याही अदृश्य झालेल्या दिसतील, अशा शब्दांत त्यांनी प्रकाश आंबेडकरांवरही कठोर शब्दांत टीका केली आहे. ठाकरे म्हणतात, आपल्या इतक्या मोठ्या देशात अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांचा सामना करताना जर मजबूत सरकार नसेल तर देश कोसळून पडेल. पंतप्रधान नरेंद्र मोदींचेही त्यांनी कौतुक केले, तसेच मोदींच्या तोडीचा एकतरी नेता महाआघाडीत आहे का? असा सवाल विचारताना महाआघाडीतल्या नेत्यांची अवस्था कसायाच्या दारात उभ्या केलेल्या बैलासारखी झाली असून ते देश काय सांभाळणार असा खोचक टोलाही त्यांनी लगावला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीसह इतर पक्षांच्या महाआघाडीची कराड येथे झालेल्या पहिल्या प्रचार सभेची उद्धव ठाकरे यांनी खिल्ली उडवली.

# निष्ठावंत नेत्यांमुळे पुण्याची उमेदवारी लटकली

**मुंबई-** राज्यातील सर्व मतदारसंघात प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना पुण्यात कॉंग्रेसमध्ये उमेदवारीची टांगती तलवार लटकवत ठेवावी लागली. संभाजी ब्रिगेडचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना पक्षश्रेष्ठींनी कॉंग्रेसची उमेदवारी देण्याचा निर्धार केल्याने पुण्यात 'ब्रिगेड' विरूद्ध 'पुणे कॉंग्रेस' अशी अटीतटीची लढाई सुरू झाली. स्थानिक कॉंग्रेस नेत्यांनी गायकवाड यांच्या उमेदवारीला कडाडून विरोध केल्याने प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांची कोंडी झाली. स्थानिक नेत्यांची मनधरणी करण्यात महिनाभर झाले तरी यश येत नसल्याने ही उमेदवारी अत्यंत प्रतिष्ठेची बनली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी कॉंग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांना प्रवीण गायकवाड यांची शिफारस केल्याचे सांगितले जाते. गांधी यांनाही गायकवाड यांच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीबद्दल शंका नसल्याने त्यांनीही हिरवा कंदिल दाखवला. पण स्थानिक पदाधिकाऱ्यांचा असहकार्याचा पवित्रा पाहून प्रदेशाध्यक्षांनी 'वेट ॲण्ड वॉच' ची भूमिका घेतली. पुण्याचे स्थानिक नेते मोहन जोशी, अभय छाजेड, उल्हास पवार, अरविंद शिंदे व अनंत गाडगीळ या पाच जणांची नावे पुणे कॉंग्रेसने प्रदेश कॉंग्रेसकडे पाठविली होती. मात्र, १९ फेब्रुवारीलाच प्रवीण गायकवाड यांच्या उमेदवारीबाबत पक्षश्रेष्ठींनी हिरवा कंदिल दाखवल्यानंतरही ध्रुवीकरणाच्या धास्तीने प्रदेश



कॉंग्रेस संशयाच्या फेऱ्यात अडकली. त्यातच स्थानिक कॉंग्रेस नेत्यांनी पक्षाबाहेरचा उमेदवार दिल्यास काम करणार नसल्याचा इशारा दिला.



# राज्यावर वीज कडाडणार!


**मुंबई- राज्य वीज नियामक आयोगाने सप्टेंबर २०१८ मध्ये दिलेल्या वीजदरवाढ आदेशानुसार राज्याला वीजपुरवठा करणाऱ्या महावितरणचे वीजदर आता १ एप्रिल २०१९ पासून पुन्हा वाढणार आहेत. घरगुती वीजग्राहकांना सरासरी सहा टक्के दरवाढीचा फटका बसणार आहे. ऐन निवडणुकीच्या काळात ही वीजदरवाढ होत असल्याने त्यावरून वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. राज्य वीज आयोगाने १२ सप्टेंबर २०१८ रोजी राज्यातील वीज वितरण कंपन्यांच्या नव्या वीजदरांना मान्यता दिली होती.**

त्यानुसार महावितरण, अदानी, टाटा पॉवर यांचे वीजदर वाढले होते. तर बेस्टचे वीजदर कमी झाले होते. महावितरणला ८२६८ कोटी रुपयांची दरवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली होती. आता १ एप्रिल २०१९ पासून नव्या आर्थिक वर्षातही पुन्हा या दरवाढीचा फटका ग्राहकांना बसणार आहे.

महावितरणच्या दरमहा १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांचा वीजदर ५.३० रुपये प्रति युनिट होता. आता या ग्राहकांची वीज १६ पैशांनी महाग होऊन त्यांना ५.४६ प्रति युनिट मोजावे लागतील. १०१ ते ३०० युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या ग्राहकांची वीज युनिटमागे २४ पैशांनी महाग होईल. ५०० युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या ग्राहकांची वीज १५ पैशांनी महाग होणार आहे. वीजदरांबरोबरच स्थिर आकारातही १० रुपयांची वाढ होणार आहे. तो ८० रुपयांवरून ९० रुपये होणार आहे. इतकेच नव्हे तर महावितरणची १२ हजार ३८२ कोटी रुपयांची दरवाढ तूर्तास लांबणीवर टाकण्यात आली असून, विधानसभा निवडणुका संपल्यानंतर कधीही ती लागू होण्याची शक्यता आहे. मुंबई उपनगरात वीजपुरवठा करणाऱ्या अदानी कंपनीच्या वीजदरांवरून मोठा गदारोळ झाला होता. आता एप्रिलपासून १०० युनिटपर्यंतच्या वीजग्राहकांचा दर २७ पैशांनी वाढून ४.७७ रुपये प्रति युनिट होणार आहे. ३०० युनिटपर्यंतच्या ग्राहकांचा दर ७.६४ रुपयांवरून २६ पैशांनी महाग होऊन ७.९० रुपये होईल. ३०० ते ५०० युनिट वीज वापरणाऱ्यांना ९.०८ रुपयांऐवजी ९.२९ रुपये मोजावे लागतील.

# पुलांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हानिहाय पथके

**मुंबई-** मुंबईतील छत्रपती शिवाजी टर्मिनसलगतच्या हिमालय पूल दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पावसाळ्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी विशेष पथकांमार्फत राज्यातील सर्व पुलांच्या सुरक्षिततेचा पुन्हा एकदा आढावा घेण्यात येणार आहे. पुराचा धोका असलेल्या पुलांच्या ठिकाणी २४ तास पूल निरीक्षक नेमण्यात येणार असल्याचे मंत्रालयातील उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले. मुंबई-गोवा महामार्गावर महाडजवळील सावित्री नदीवरील ब्रिटिशकालीन पूल ऑगस्ट २०१६मध्ये कोसळल्यानंतर राज्यातील पुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्या वेळी सर्वच पुलांची संरचनात्मक तपासणी करून धोकादायक पुलांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्याचा निर्णय राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला होता. त्यानुसार अनेक पुलांची दुरुस्ती, पुनर्बांधणी करण्याचे काम सुरू झाले असतानाच गेल्याच आठवड्यात मुंबईत 'हिमालय पूल' दुर्घटना घडली. त्यानंतर पुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पावसाळ्यात पूलदुर्घटना टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने



राज्यभरातील अभियंत्यांना कामाला लावले आहे. पावसाळ्यापूर्वी विभागाच्या आधिपत्याखालील रस्त्यांवरील सर्व पुलांची संरचनात्मक तपासणी आणि आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यात कुचराई केल्यास आणि एखादी दुर्घटना घडल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# स्टेशनवरील वडा, समोसाही बंद होणार?

**मुंबई-** मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गावरील स्थानकांवर सरबते विकण्यावर घातलेल्या बंदीपाठोपाठ आता वडा, समोस्यावरही बंदी घालण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. हे पदार्थ बनवताना स्वच्छतेची पुरेशी काळजी घेतली जात नाही. तसेच वारंवार वापरलेल्या



तेलात ते तळले जातात, अशा असंख्य तक्रारी आल्याने अन्न आणि औषध भेसळ प्रतिबंधक विभाग, रेल्वे प्रशासन या पदार्थांवर बंदीचा विचार करीत आहे.

स्थानकात भरगर्दीत हे पदार्थ तळले जात असल्याने त्याचा प्रसंगी प्रवाशांच्या जीवाला धोका उद्भवू शकतो, याचा विचार करून सुरक्षेच्या कारणास्तवही पदार्थ तळण्यावर बंदी येऊ शकते, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर स्पष्ट केले. रेल्वे स्थानकांतील खाद्यपदार्थांचा दर्जा खराब असतो. ते तयार केले जाणारे ठिकाण अस्वच्छ असते, हे लक्षात आल्याने या पदार्थांवर बंदीचा विचार सुरू झाला आहे. हार्बर मार्गावर वाशीच्या पुढे आणि ट्रान्सहार्बर मार्गावर कॅन्टीन नसूनही प्रवाशांचे काही अडलेले नाही. उलट फलाटांवर अधिक मोकळी जागा उपलब्ध होते, स्वच्छता राहते हे लक्षात आल्याने लवकरच हा निर्णय प्रत्यक्षात येण्याची चिन्हे आहेत. रेल्वे स्थानकांतील विक्रेते स्वच्छतेचे कोणतेही नियम पाळत नाहीत. कॅन्टीनमध्ये काम करतो, असे कारण देत त्या नावाखाली अनेकांचा स्थानकांत मुक्त वावर असतो. त्यामुळे रेल्वे सुरक्षा बल, रेल्वे पोलीस आणि रेल्वे प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव कॅन्टीनचा मुद्दा पुढे आणला आहे. यापूर्वी स्थानकांतील वडापाव आणि समोस्यात कीटक आढळल्याच्या घटना समोर आल्या होत्या. लिंबूपाण्यानंतर सोशल मीडियावरून व्हायरल झालेल्या एका मेसेजमध्ये समोस्यावर पाय ठेवून झोपलेल्या व्यक्तीचा फोटो फिरत होता.

# रेल्वे स्थानकात पाठलाग करुन तरुणीचे घेतले बळजबरीने चुंबन

**मुंबई-** तरुणीचा पाठलाग करत जबरदस्तीनने चुंबन घेणाऱ्या २५ वर्षीय तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. रविवारी कांजूरमार्ग रेल्वे स्थानकाबाहेर हा प्रकार घडला. आरोपीचं नाव वसीम शेख असून तो पवईचा रहिवासी आहे. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करत अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि आरोपी तरुण एकाच परिसरात राहतात. आरोपी वसीमने अनेकदा तरुणीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र तरुणीने त्याच्याकडे दुर्लक्ष केलं होतं. यानंतरही वसीम शेख अनेकदा तरुणीचा पाठलाग करत होता. रविवारीही आरोपी वसीमने विक्रोळीत तरुणीचा पाठलाग केला. तरुणीने रेल्वे स्थानकात प्रवेश करताच आरोपी वसीमने हात पकडला आणि जबरदस्तीने खेचत तरुणीला बाहेर



नेलं. यानंतर त्याने सर्व लोकांसमोरच तरुणीचं चुंबन घेतलं. 'तरुणीने कुटुंबीयांना घडलेल्या प्रकाराबद्दल सांगितलं असता त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार केली. यानंतर आम्ही तात्काळ गुन्हा दाखल करत तपास सुरु केला. चालक म्हणून काम करणाऱ्या आरोपी वसीमचा शोध घेण्यासाठी आम्ही टीम पाठवली. आम्ही त्याच्या घरातून त्याला अटक केली आहे', अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने दिली आहे.

# डान्सबारमध्ये दौलतजादा करणाऱ्यांची नशा उतरली!

**मुंबई- बेकायदा डान्सबारवरील कारवाईत अटक केलेल्या ४७ आरोपींची रविवारी दंडाधिकारी न्यायालयाने भंबेरी उडविली. आरोपींच्या कुटुंबाला न्यायालयात आणा. ते रात्री कुठे असतात, काय करतात, हे त्यांच्या कुटुंबीयांनाही कळू द्या.. अशा सूचना दंडाधिकाऱ्यांनी दिल्या. मात्र अखेर त्यांनी आरोपींच्या जामिनाची रक्कम बालकाश्रमाला दान करण्याचे आदेश देत सर्वांना जामीन मंजूर केला.**

गुन्हे शाखेच्या कक्ष-२ ने शनिवारी मध्यरात्री ताडदेव येथील 'इंडियाना' बारवर छापा घातला. पूर्वी या बारचे परवाने 'परफॉर्मिंग डान्स बार असोसिएशन'चे अध्यक्ष भरत ठाकूर यांच्या नावे होते. ऑर्केस्ट्राच्या नावाखाली



येथे बारबाला नृत्य, अंगविक्षेप करतात अशी माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. छापा घातल्यानंतर ही बाब स्पष्ट झाली. या कारवाईत ४७ जणांना अटक करण्यात आली. त्यात ग्राहक, बारमधील कामगार, कर्मचाऱ्यांचा समावेश होता. आठ बारबालांना नोटीस बजावून पुढील कारवाईसाठी पोलीस ठाण्यात येण्यास सांगण्यात आले.

रविवारी ४७ आरोपींना दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिसांच्या युक्तिवादात 'इंडियाना' बारकडे नृत्याचा परवाना नाही, अन्य परवान्यांची मुदत संपुष्टात आली आहे, अशी माहिती पुढे आली. तसेच कारवाई करण्यात आलेल्या बारबालांचे कृत्य, ग्राहकांकडून होणारी पैशांची उधळण याविषयीही पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. हे तपशील ऐकून न्यायालयाने ४७ आरोपींच्या माता-भगिनी, पत्नीला न्यायालयात बोलावण्याची सूचना पोलिसांना केली. त्यांना आपला पती, भाऊ, मुलगा रात्री कुठे असतो, काय करतो, बारबालांवर किती पैसे उधळतो हे समजू शकेल. संसाराठी खर्च करण्याऐवजी आरोपींनी ती रक्कम बारबालांवर उधळली, हेही त्यांच्या कुटुंबाला समजणे आवश्यक आहे. पुन्हा असा गुन्हा करणार नाही, अशी हमी प्रतिज्ञापत्रावर द्यावी, अशीही सूचना दंडाधिकाऱ्यांनी केली. यासाठी रात्री आठ वाजेपर्यंत कामकाज सुरू ठेवण्याची आपली तयारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



# 'बेस्ट'मध्ये पुन्हा यंत्राद्वारे तिकीट

**मुंबई-** बेस्टमधील बंद पडलेली ई-टिकिटिंग म्हणजेच 'ट्रायमॅक्स' या यंत्राद्वारे तिकिटे देण्याची सेवा पुन्हा सुरू करण्यात येत आहे. गोराई, मागाठाणे या पाठोपाठ आता वडाळा आगारातील वाहकांना ही यंत्रे देण्यात आली आहेत. नादुरुस्त झालेली ट्रायमॅक्स यंत्रेच दुरुस्ती करून पुन्हा वापरात आणली जाणार आहेत. बेस्टमध्ये २०१० पासून ई-तिकीट सेवा सुरू करण्यासाठी 'ट्रायमॅक्स आयटी इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिस' कंपनीशी करार करण्यात आला होता. त्या आधी तिकिटावर चिमट्याने खूण करून ते तिकीट प्रवाशांना दिले जाई. परंतु नव्याने आलेल्या ट्रायमॅक्स यंत्रांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने ती हाताळताना वाहकांना अडचणी येऊ लागल्या होत्या. बंद यंत्रांमुळे तिकीट देता येत नसल्याने प्रवासी व वाहक यांच्यात खटके उडत होते. कंत्राट संपल्यानंतर ई-तिकिटिंगकरिता कोणीही सेवा देण्यास पुढे न आल्याने ट्रायमॅक्सलाच पुन्हा कंत्राट देण्यात आले. बेस्टमध्ये ट्रायमॅक्सची ९ हजार ५०८ यंत्रे आहेत. त्यातली बहुतांश नादुरुस्तच झाल्याने या यंत्रांचा वापर बंद करण्यात आला आणि बेस्टने पुन्हा एकदा जुन्या 'टिकटिक' तंत्राद्वारे तिकीट देण्यास सुरुवात केली. काही आगारांत या यंत्राच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते. त्यानुसार गोराई, मजास, मागाठणे, मालवणी, मरोळमधील यंत्रे दुरुस्त करून ती वापरात आणली गेली आहेत. आता वडाळा आगारातही ही यंत्रे वापरात आणली जाणार आहेत. लांब पल्ल्याच्या मार्गावर प्रामुख्याने ही यंत्रे वापरली जात आहेत.

# कोट्यवधींची टोलवसुली ठेकेदाराच्या खिशात

**मुंबई-** प्रवाशांकडून वसूल केला जाणारा कोट्यवधी रुपयांचा टोल सरकारच्या तिजोरीत न भरता तो आपल्याच खिशात ठेवणाऱ्या ठेकेदारापुढे राजकीय वरदहस्तामुळे सरकारनेच गुडघे टेकल्याची बाब समोर आली आहे. सायन-पनवेल महामार्गावरील खारघर टोलनाक्याच्या ठेकेदाराने गेल्या तीन महिन्यांपासून टोलवसुलीची रक्कम सरकारला दिलेली नसून शर्तभंगाच्या नोटिसांनाही केराची टोपली दाखवली आहे. एवढेच नव्हे तर बुधवार रात्री हा टोलनाका ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकासही ठेकेदाराने पळवून लावल्याचे समजते. विरोधी पक्षातील एका बड्या नेत्याच्या वरदहस्तामुळे ठेकेदाराच्या या मनमानीपुढे सरकारही हतबल झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.


## पाहिजेत

पोलिस बातमीपत्र या कार्यालयात पूर्ण वेळ चहा, पाणी व साफ-सफाईसाठी महिला पाहिजे. शिक्षणाची व वयाची अट नाही. गरजू स्त्रियांनी संपर्क साधावा

मो.: ८४२४९८९८९८ / ९५९४४१८१८१, ८६९२०११११०


पृष्ठ १ वरुन

## वाहन अन् सिलिंडरच्या किमती...

त्यानुसार प्रमाणित वजावटीची (स्टँडर्ड डिडक्शन) मर्यादा ४० हजार रुपयांवरून ५० हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

करमुक्त व्याजमर्यादेत वाढ: व्याजापोटी मिळणाऱ्या उत्पन्नावरील करकपातीची मर्यादा (टीडीएस) आता ४० हजार रुपये करण्यात आली आहे. याआधी ती १० हजार रुपये होती. ज्या व्यक्तींना बँकेत किंवा पोस्टात असलेल्या मुदत ठेवींवर व्याज प्राप्त होते. अशा ठेवीदारांना वार्षिक दहा हजार रुपयांपर्यंतच्या व्याजावर कर भरावा लागत होता. तो आता ४० हजार रुपयांपर्यंतच्या व्याजावर भरावा लागणार आहे. ठेवीदारांच्या दृष्टिकोनातून हा महत्त्वाचा निर्णय आहे.

**दोन घरे असणाऱ्यांना दिलासा:** हंगामी अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे आता करदात्याकडे दुसरे घर असेल तर ते देखील 'सेल्फ ऑक्युपाइड' मानले जाईल आणि त्या माध्यमातून मिळालेल्या उत्पन्नावर कोणत्याही प्रकारचा कर द्यावा भरावा लागणार नाही. सध्या मात्र, एकापेक्षा अधिक घरे असल्यास एकच घर 'सेल्फ ऑक्युपाइड' मानले जाते आणि दुसरे घर असल्यास त्यापासून उत्पन्न मिळत आहे असे गृहीत धरून ते करपात्र मानले जात होते. आता मात्र दुसरे घर देखील 'सेल्फ ऑक्युपाइड' मानले जाणार आहे.

**फिजिकल शेअर असतील तर डिमॅट करून घ्या:** फिजिकल शेअर पडून असतील तर ते कायदेशीर वारसाच्या नावाने डिमॅट करून घेणे गरजेचे आहे. 'सेबी'ने अशा शेअरच्या संबंधित कायद्यामध्ये बदल केले आहेत. एक एप्रिल २०१९ नंतर फिजिकल शेअरच्या हस्तांतरावर (ट्रान्स्फर) निर्बंध येणार आहेत.

- जीवन विमा होणार स्वस्त : जीवन विमा स्वस्त होणार असून विमा कंपन्यांना जीएसटीच्या नव्या नियमांचे पालन करावे लागणार आहे. विमा कंपन्या आतापर्यंत २००६-०८ चा डेटा वापरत होते मात्र १ एप्रिलपासून विमा कंपन्यांना नव्या डेटाचा आधार घ्यावा लागणार आहे. जो २०१२-२०१४ साली तयार करण्यात आला होता. या नव्या बदलाचा फायदा २२ ते ५० वर्ष वयोगटाला होणार आहे.

**लोन घेणं स्वस्त :** एप्रिलपासून सर्व प्रकारचे लोन स्वस्त होण्याची शक्यता आहे. आता तुम्ही घेतलेल्या कर्जावर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार बँकांमध्ये एमसीएलआर ऐवजी रेपो रेट लावला जाणार आहे. रिझर्व्ह बँकेचा रेपो रेट घटल्यास व्याजदरातही कपात होणार आहे. व्याजदर वाढवणे किंवा कमी करणे आता बँकेच्या हातात राहणार नाही. रिझर्व्ह बँकेची बँकेच्या व्याजदरांवर नजर राहणार आहे. यामुळे कर्ज स्वस्त होऊ शकते.

**कार खरेदी महाग :** १ एप्रिलपासून कार खरेदी महाग होणार आहे. १ एप्रिलपासून कार खरेदी करणे महाग होणार आहे. टाटा मोटर्स, रेनॉल्ट इंडिया, जगुआर लैंड रोवर इंडिया (जेएलआर), महिंद्रा एंड महिंद्रा, टोयोटा मोटर्स कार बनवणाऱ्या वस्तुंवरील किंमतीत वाढ करणार आहेत. कच्च्या मालाच्या किंमती वाढल्याने वाहने महागणार आहेत.

## राजीनामे मंजूर, आमदारांच्या...

लोहा विधानसभेचे विद्यमान आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनीही शिवसेनेला सोडचिठ्ठ दिली असून ते भाजपकडून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांच्याविरोधात नांदेडमधून निवडणूक लढवित आहेत. नांदेड महापालिकेच्या निवडणुकीत चिखलीकरांनी पक्ष आदेश डावलून भाजपला मदत केली होती.

**राजीनामे मंजूर**

जाधव, चिखलीकर व धानोरकर यांचे राजीनामे विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी मंजूर केले आहेत. त्यामुळे तिन्ही विधानसभांच्या जागा रिक्त झाल्या असून केंद्रीय निवडणूक आयोगाला यासंदर्भात अहवाल देण्यात आला आहे. केवळ सहा महिने शिल्लक राहिल्याने येथे पोटनिवडणुकीची शक्यता नाही.

## संपादकीय...

# भाजप आणि काँग्रेसची रणनीती


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

**यंदाची लोकसभा निवडणूक ही २०१४ सारखी एकतर्फी ठरेल, असे वाटत नाही. निदान वरकरणी तरी तसेच भासत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा सत्तेत येण्यासाठी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने, तर त्यांना रोखण्यासाठी विरोधी पक्षांनी यंदा पुरेसा गृहपाठ केलेला दिसतो. प्रसिद्धी माध्यमे आणि सोशल मीडियाची अजस्र यंत्रणा वापरून पंतप्रधान मोदी यांची लोकप्रियतेवर आरूढ होण्यासाठी सज्जता झाली आहे, तर उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालचा अपवाद वगळता बहुतेक राज्यांत प्रमुख प्रादेशिक पक्षांचे काँग्रेसशी 'सामंजस्य' झाले आहे. मागच्या अनुभवातून शहाणे होत विरोधी पक्षांनी भाजप-रालोआविरोधी मतांमध्ये लक्षणीय फूट पडणार नाही याची (शक्य तितकी) काळजी घेतली आहे, तर स्वबळावर बहुमत मिळवूनही भाजपने लहान-लहान पक्षांशीही हातमिळवणी करीत जमिनीवर राहण्याचा प्रयत्न चालविला आहे. यावेळी, पंतप्रधान मोदी विरुद्ध तमाम विरोधी पक्ष असे चित्र रंगविले जात असले तरी त्याच्या आडून भाजपनेही लहानमोठ्या अशा ४० हून अधिक पक्षांसोबत मोर्चे बांधले आहेत. भाजपच्या अन्य नेत्यांचा प्रचार आणि वक्तृत्व प्रभावी ठरत नसल्याचे 'कार्पेट बॉम्बिंग' प्रचारतंत्रातून निष्पन्न झाल्याने भाजपची सारी भिस्त प्रामुख्याने मोदी आणि अध्यक्ष अमित शहा यांच्याच प्रचारावर असेल.**



**होलाष्टकाच्या अशुभ कालखंडात प्रचार आणि अन्य शुभ कार्यांपासून दूर राहणारे मोदी प्रचाराचा नारळ फोडण्याआधी 'विज्ञानवादी' बनले. अंतराळातील भारताचा पराक्रम अधोरेखित करीत त्यांनी उत्तर प्रदेशातील मेरठपासून पूर्ण ताकदीनिशी झंझावाती सभांना सुरुवात केली. गेल्यावेळी उत्तर प्रदेश व बिहारमधील १२० पैकी १०४ जागांची कमाई करणाऱ्या भाजप आघाडीला हे संख्याबळ बहुतांश शाबूत राखले तरच सत्तेत परतण्याची संधी मिळू शकेल. या जाणिवेतूनच भाजपने रणनीती आखली आहे. कर्नाटक वगळता दक्षिणेतील पाच राज्यांमध्ये भाजपला फारशी संधी दिसत नाही. दुसरीकडे उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष यांची आघाडी झाली असली तरी त्यांचे काँग्रेसशी जमलेले नाही. या दुहीचा फायदा उठविण्याचा मोदी-शहांचा प्रयत्न आहे. पण प्रियांका गांधी वाड्रा यांच्या पदार्पणामुळे तेथील चित्र काहीसे धूसर झाले आहे. मोदी-शहांप्रमाणेच राहुल-प्रियांका यांच्या प्रचारावर काँग्रेसची मदार असेल. त्यांच्यासोबत कन्हैयाकुमार, ममता बॅनर्जी, चंद्राबाबू नायडू, अखिलेश यादव, शरद पवार, मायावती, केजरीवाल, तेजस्वी यादव, कुमारस्वामी, राज ठाकरे, हार्दिक पटेल आदींमुळे कागदावर तरी विरोधी पक्षांच्या प्रचाराचे पारडे जड दिसू शकते. यंदा विरोधी पक्षांच्या ऐक्याला शक्य तितके तडे देण्याला भाजपने सर्वोच्च प्राधान्य दिले. त्याला उत्तर प्रदेश, बंगालमध्ये यशही आले. दुसरीकडे काँग्रेसनेही प्रादेशिक मित्रपक्षांच्या साथीने किमान चारशे मतदारसंघांत एकास एक लढतीच्या माध्यमातून भाजप आघाडीला शह देण्याचे डावपेच आखले आहेत. निकालांनंतर आंध्रमध्ये जगनमोहन रेड्डींची वायएसआर काँग्रेस, उडिशात नवीन पटनाईक यांचा बिजू जनता दल आणि तेलंगणात के. चंद्रशेखर राव असे किमान ४५ खासदारांचे समर्थन भाजपने गृहित धरले आहे. पण निकालांनंतर काय याची विरोधी पक्षांमधील एकवाक्यता अद्याप दिसलेली नाही. प्रचारात प्रयत्नपूर्वक आणलेले मुद्दे पाऱ्यासारखे निसटून जाणे, ही भाजपची डोकेदुखी ठरू शकते. पुलवामा-बालाकोटमुळे निर्माण झालेला राष्ट्रवादाचा ज्वर ओसरल्याचे लक्षात येताच मोदींनी राहुल गांधी यांच्या राफेलप्रणित 'चौकीदार चोर है' घोषणेला शिंगावर घेत 'मै भी चौकीदार' मोहीम सुरू केली. पण त्यानंतर काही दिवसांतच राहुल गांधींनी गरिबीच्या रेषेखालील कुटुंबांना वर्षाकाठी ७२ हजार रुपयांची किमान उत्पन्नाची हमी देणारा मुद्दा आणला. आता तो खोडून काढण्याची वेळ भाजपच्या प्रचारयंत्रणेवर आली आहे. यंदा मोदींनी केवळ उत्तर प्रदेशातून लढण्याचे ठरवून गुजरातची जबाबदारी गांधीनगरमध्ये लढणाऱ्या अमित शहांवर सोपवली आहे. राहुल गांधी यांनीही केरळच्या वायनाडमधून लढण्याची तयारी चालविली असून भाजपला शह देण्यासाठी अमेठीतून प्रियांका गांधी-वाड्रांनाही उतरविण्याची खेळी काँग्रेस खेळू शकते. जमीन, आकाश आणि अंतराळात 'सर्जिकल स्ट्राइक' करणारा भारत बलवान झाल्याची ग्वाही देत पुलवामा-बालाकोटनंतर निर्माण झालेला राष्ट्रवादाचा जोश भाजपने प्रचाराच्या केंद्रस्थानी आणला आहे; तर वाढती बेरोजगारी, गरीब कुटुंबांना किमान उत्पन्न, शेतकऱ्यांपुढचे संकट, महिलांची सुरक्षा, राफेल घोटाळ्यासहित इतर भ्रष्टाचार या मुद्द्यांवर ठाम राहण्याचा पवित्रा काँग्रेस व इतर विरोधकांनी घेतला आहे. आता नव्वद कोटी मतदार या दोन्ही आघाड्यांमधील कोणाचा प्रचार मनावर घेतात हे समजायला फार वेळ उरलेला नाही.**

# भारतातील स्वमग्न मुलांविषयी जागरूकता आणण्यासाठी चित्रपट क्षेत्राने पुढाकार घेणे गरजेचे

# गरोदरपणात विशेष काळजी न घेतल्यामुळे स्वमग्न मुये होतेय वा

ऑटिझमग्रस्त असलेल्या व्यक्तीचे आयुष्य सुंदर आणि सुसह्य बनवण्यासाठी डॉक्टर, पालकव समुपदेशक अशा सगळ्यांनी या आजाराचा स्विकार करून त्या मुलाला समाजामध्ये ताठ मानेने जगण्यासाठी २ एप्रिल रोजी जागतिक स्वमग्नता दिन पाळला जातो. आपल्या समाजामध्ये आजही स्वमग्न मुलांना सन्मानाने वागविले जात नाही याउलट त्याची टींगल टवाळी करण्यावर जास्त भर दिला जातो. ऑटिझम म्हणजेच स्वमग्नता म्हणजे नेमकं काय ते माहीत नसल्यामुळे अशा मुलांना अनेकवेळा 'मतिमंद' समजले जाते,परंतु मतिमंद आणि ऑटिझम यात बराच फरक आहे. मूल २ ते ३ वर्षांचं होईपर्यंत त्याच्या पालकांनाही स्वमनगणेबाबत कल्पना नसते. कधी कधी तर ८-१० वर्षांपर्यंतही काहीही लक्षात येत नाही. ऑटिझम हा बालपणात मज्जातंतूंच्या विकासाशी (न्युरो डेव्हलपमेंट) संबंधित विकार आहे. मेंदूतील काही भागांच्या अकार्यक्षमतेमुळे या मुलांची मानसिक क्षमता विकसित होत नाही. यामुळे अर्थबोध, विचार करण्याची क्षमता, वाचा, संवाद साधणे व वागणे यात समस्या निर्माण होतात. ही मुले इतर मुलांसारखी दिसत असली, तरी त्यांचे दैनंदिन जीवन इतरांसारखे नसते. ऑटिझमग्रस्त मुलांच्या काही समस्या वेगळ्या असतात. त्यांची विशेष काळजी घेण्याची गरज असते. या आजाराविषयी अधिक माहिती देताना स्वमग्न मुलांसाठी कार्यरत असलेल्या बालविकास तज्ञ व निरामय गायडन्स क्लीनिकच्या संचालिका डॉ अंजना थडानी सांगतात, 'ऑटिझमने ग्रस्त असलेल्या मुलांना सांभाळणे आणि त्यांच्यावर उपचार करणे अत्यंत आव्हानात्मक काम मानले जाते. मतिमंद मुलांचा बुद्ध्यांक सरासरीपेक्षा कमी असतो तर ऑटिझमग्रस्त मुलांचे बुद्ध्यांक सरासरी म्हणजे सत्तरच्या वर असू शकतो. पाच टक्के मुलांचा सरासरीहून अधिक म्हणजे शंभरपर्यंत असू शकतो.

### जागतिक स्वमग्नता दिन - २ एप्रिल २०१९



परंतु त्या मुलांना स्वतःला व्यक्त करता येत नसल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष होते. ऑटिस्टीक मुलांना नुसतेच शाळेत घालून उपयोग नसतो, प्रत्येक मुलाची क्षमता, कल लक्षात घेऊन त्याप्रमाणे शिक्षण देणे आवश्यक ठरते. स्पीच थेरपी, फिजिओ थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, म्युझिक थेरपी, डान्स ड्रामा थेरपीचा वापर करावा लागतो. शैक्षणिक विकास पद्धती, कल्पकतेचा वापर करून शिकवावे लागते.

ज्याचा उपयोग मुलांना व्यावसायिकरित्या सक्षम करण्यासाठी होऊ शकतो. तारे जमीन पार हा अमोल गुप्ते व आमीर खान यांचा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर डिस्लेक्सिया या आजारावर समाजामध्ये एक चांगली चर्चा घडवून आणली होती व 'पा' या चित्रपटाद्वारे सुद्धा एका गंभीर आजाराची मांडणी योग्यरीत्या करण्यात आली. स्मिता तळवलकर यांनी बनविलेल्या 'चौकट राजा' तसेच नुकत्याच आलेल्या कच्चा लिंबू या चित्रपटाने गतिमंद मुलांच्या आई वडिलांची कशी कुचंबणा होते हे दाखवले होते. स्वमग्नता या आजाराविषयी समाजात जनजागृती करावयाची असेल तर भारतातील चित्रपट क्षेत्राने यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.आज भारतामध्ये दरवर्षी हजारोंच्या संख्येने चित्रपट निर्माण केले जातात म्हणूनच स्वमग्नता व त्या संबंधित आजारांवर दरवर्षी चित्रपट आले तर समाजाचा दृष्टीकोन नक्कीच बदलण्यास हातभार लागेल.'

मुलांमध्ये ऑटिझम होण्याच्या समस्येबाबत सांगताना तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेन्टरच्या बालरोगतज्ञ आणि निओनॉलॉजिस्ट डॉ. मनीषा शिरोडकर सरदार सांगतात, 'जनुकीय, अर्भकावस्थेतील गुंतागुंत, आईची जीवनशैली व तणावाचे प्रमाण हेही या विकारास कारणीभूत ठरू शकते. गरोदरपणाच्या काळात काही औषधांचे सेवन हेही ऑटिझमच्या कारणांपैकी एक कारण असू शकते. सतत ताप येत असेल, अचानक फ्लूची लागण होत असेल तर किंवा कुठलेही अँटिबायोटिक्स घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ल्या घ्यावा. वातावरणात असलेल्या टेराटोजेन्स आणि पाऱ्याच्या प्रमाणामुळेही अपत्याला जन्मजात ऑटिझमचा विकार असू शकतो. आनुवंशिकता, पालकत्वाचे वाढलेले वय, गर्भावस्थेतील होणारे काही आजार, ऑक्सिजनची कमतरता, प्रिमॅच्युअरमुळे उद्भवणारे काही आजार, जन्मानंतर निर्माण होणारे मेंदूतील काही प्रकारचे संसर्ग, सामाजिक जीवनशैली ही प्रमुख वैद्यकीय कारणे ऑटिझम आजाराची आहेत.

आज आज संपूर्ण जगामध्ये ७ करोडहून अधिक स्वमग्न नागरिक आहेत व यातील एक करोडहुन अधिक नागरिक (यात लहान मुलांचा समावेश आहे) भारतामध्ये आहेत 'ऑटिझमवरच्या उपचारपद्धतीवर सध्या जगभरात संशोधन सुरू आहे.पण सध्या तरी हा विकार पूर्ण बरा करू शकणारे उपचार विज्ञानाकडे नाहीत. त्यामुळेच ऑटिझमग्रस्त मुलाच्या कुटुंबाची, समाजाची जबाबदारी अधिक वाढते. म्हणूनच प्रत्येकाने जबाबदारीने या आजाराविषयी सखोल माहिती करून घेणं कधीही सोयीस्कर असतं.ऑटिझमने ग्रस्त असलेल्या मुलांना सांभाळणे आणि त्यांच्यावर उपचार करणे अत्यंत आव्हानात्मक काम मानले जाते. ऑटिस्टिक मुलांच्या प्रश्नांना सहानुभूतीची किनार असते. त्याऐवजी समाजाने पुढाकार घेऊन या मुलांना मुख्य प्रवाहात सामावून घ्यायला हवे अशी मागणी समाजातील सर्वच स्तरातून झाली पाहिजे तरच ऑटिझम या आजारावर आपण मात करू शकतो असे मत डॉ. अंजना थडानी यांनी व्यक्त केले.

**- उमेश भोगले**

# मीटरला बगल देत रिक्षाचालकांची मनमानी सुरुच

**विरार :** वसई विरारमध्ये पश्चिमेला सर्वत्र रिक्षा चालकांचा मनमानी कारभार चालत असल्यामुळे नागरिक हैराण झालेले आहेत. मीटरचे पालन न करणे, हवे तसे पैसे मागणे हे रिक्षा चालकांचे रोजचे काम झाल्याने नागरिकांना प्रवास करण्यात अडचणी जाणवत आहेत.



वसई विरार मध्ये पश्चिम भागात पर्यटक स्थळे असल्याने बाहेरून मोठ्या प्रमाणात पर्यटक याठिकाणी फिरण्यासाठी येत असतात. बाहेरच्या नागरिकांची ज्याप्रकारे फसवणूक केली जाते त्याचं प्रकारे स्थानिक रहिवाशांना देखील फसवले जात आहे. शहरात सर्वत्र मीटरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, रिक्षा चालक त्याचे पालन करत नाही. त्यांच्याकडून ठराविक भाडं ठरवले जाते व त्या ठिकाणी तितकेच भाडं घेतलं जातं. अंतर कमी व भाडं जास्त अशी पद्धत सुरु असल्याने नागरिक हैराण आहेत.

इतकेच नाही तर रिक्षा चालकांना मीटर वापरण्यास सांगितले की, ते करणे देतात. मीटरची वायर उंदराने खाल्ली, मीटर मध्ये पाणी गेले, मीटर खराब आहे. यासारखे करणे देऊन विषय टाळला जातो. पाच ते दहा मिनिटांच्या अंतरासाठी ४० रु पये घेतले जातात. अंबाडी रोड येथे शेअरिंग घेत नाहीत आणि कोणी शेरिंगमध्ये जायचं प्रयत्न केला तर रिक्षा चालक त्याला उतरवतात. ७० ते ८० रु पये मागू लागतात.

येथील स्थानिक जगदीश केळशीकर यांनी असे म्हणतात की, एखाद्या नागरिकाने या विरोधात आवाज उठवला तर त्याचाशी भांडायला रिक्षा चालक गँगकरुन येतात. अनेकदा शेअरिंगच्या पद्धतीत देखील अशा प्रकारची अरेरावी केली जाते. १० रु पयाच्या शेअरिंग मध्ये ३५ रु पये मागितले जातात व नागरिकांची लुट होते. वसई स्थानक ते ओम नगर स्पेशल भाडे ३५ रु पये घेतले जाते. हे अंतर एक किलोमीटर देखील नाही. मीटर कधीच चालू नसतो आणि असल्यास २० रु पये भाडं आकारले जाते. त्याठिकाणी रिक्षा चालक ४० रु पये घेतात. रिक्षा चालक त्यांच्या होशोबाने भाडं ठरवत असल्याने नागरीकांना प्रवास म्हणजे भुर्दंड ठरत आहे.

रिक्षा चालाकंची लुट थांबावी यासाठी आर.टी.ओ यांनी मीटरची सुविधा सुरु केली मात्र, रिक्षा चालकांचा मनमानी कारभार सुरूच आहे. या विरोधात तक्र ार नोंदवण्यास नागरिक गेल्या नंतर त्यांना राजकीय पक्षांची भीती घातली जाते. आरटीओने याविरोधात मोहीम सुरु केली आहे. याचे गांभिर्य देखिल मस्तवाल रिक्षा चालकांना नाही. नागरिकांची लुट होत असली तरी रिक्षा चालक न सुधारण्याची भाषा करत असल्याने हा पेच अधिक वाढला आहे.

# बेकायदा बांधकाम प्रकरणी अधिकारी 'एसीबी' चौकशीच्या फेऱ्यात

*गेल्या १० वर्षांत या संख्येत ४७ हजार २७३ नवीन बेकायदा बांधकामांची भर*

**कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीत उभारलेल्या १८ हजार बेकायदा बांधकामांच्या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याच्या तक्रारी आहेत, त्यांच्या चौकशीसाठी परवानगी देण्यात यावी, अशी मागणी लाचलुचपत प्रतिबंधक (एसीबी) ठाणे विभागाच्या अधीक्षकांनी राज्याच्या नगरविकास विभागाकडे केली आहे.**

नगरविकास विभागाने पालिका आयुक्तांना पत्र पाठवून तातडीने बेकायदा बांधकामे आणि त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल पाठविण्याचे आदेश दिले आहेत. यात विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल आणि पालिकेच्या अहवालाची वाट न पाहता 'एसीबी'ला चौकशी परस्पर परवानगी दिली जाईल, असे नगरविकास विभागाने कळवले आहे.

२००६ पूर्वी शहरात ६७ हजार ९२० बेकायदा बांधकामे होती. गेल्या १० वर्षांत या संख्येत ४७ हजार २७३ नवीन बेकायदा बांधकामांची भर पडली आहे. २७ गाव हद्दीत पाच हजार नवीन बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत. कल्याण डोंबिवली पालिका



हद्दीतील बेकायदा बांधकामांवर पालिका अधिकाऱ्यांकडून कारवाई केली जात नाही, अशी तक्रार करत माहिती कार्यकर्ते कौस्तुभ गोखले, श्रीनिवास घाणेकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात ११ वर्षांपूर्वी जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर निर्णय देताना तत्कालीन न्या. आर. एम. लोढा, न्या. नरेश पाटील यांनी २००६ नंतर ज्या प्रभागांच्या हद्दीत बेकायदा बांधकामे उभी राहतील त्या प्रभाग अधिकाऱ्यांना बेकायदा बांधकामप्रकरणी दोषी ठरवून आयुक्तांनी त्यांच्यावर कारवाई करावी, असे आदेशात म्हटले होते.

अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे शहरात बेकायदा बांधकामे उभी राहून शहर बकाल झाले आहे. बेकायदा बांधकामांची दखल अतिक्रमण नियंत्रण, प्रभाग अधिकारी घेत नाहीत म्हणून घाणेकर यांनी बेकायदा बांधकामांची पाठराखण करणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांची चौकशी आणि त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (अॅन्टीकरप्शन ब्युरो) ठाणे विभागाचे अधीक्षक यांच्याकडे केली आहे. या तक्रारीची कागदोपत्री सत्यता पडताळल्यानंतर 'एसीबी' अधिकाऱ्यांना या प्रकरणात पाणी मुरत असल्याचा संशय आला.

पालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामांसंदर्भातचे अहवाल वेळोवेळी शासनाकडे पाठविले जातात. अशी पत्रे शासनाकडून नियमित येतात. विधिमंडळ अधिवेशनाच्या माध्यमातून विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने पालिकेकडून शासनाला माहिती कळविली जाते. यासंदर्भातच्या विविध तक्रारी विविध स्तरावर केल्या जातात.

# बचतगटांच्या उलाढालीवरही लक्ष राहणार, भरारी पथके सक्रिय

**नवी मुंबई : निवडणुकांदरम्यान मतदारांना विविध मार्गांनी प्रलोभने दाखविण्यात येतात. यापूर्वीच्या निवडणुकांमध्ये बचतगटांच्या बँक खात्यांवर पैसे जमा केल्याचीही चर्चा आहे. यामुळे प्रशासनाने बचतगटांच्या व्यवहारांवरही लक्ष ठेवण्यास सुरुवात केली असून, भरारी पथकेही सक्रिय केली गेली आहेत.**

लोकसभा निवडणुकांमध्ये उमेदवारांकडून मतदारांना आमिष दाखविले जाण्याची शक्यता आहे. अनेक वेळा मतदारांना रोख पैसे दिले जातात. पैसेवाटप करणे धोक्याचे ठरत असल्यामुळे किमती वस्तूही भेट म्हणून दिल्या जातात. दारू, मटणाच्या मेजवान्याही दिल्या जातात. बहुतांश प्रलोभने ही पुरुषांनाच दिली जातात. महिला मतदारांची संख्या वाढत असूनही त्यांना थेट लाभ दिले जात नव्हते. यामुळे मागील काही निवडणुकांमध्ये बचतगटांच्या माध्यमातून महिलांपर्यंत मदत पोहोचविण्याची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्याची चर्चा आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या योजना विभागामध्ये तब्बल ५९१५ गटांची नोंद आहे. तब्बल सव्वालाख महिला या चळवळीमध्ये सक्रिय आहेत. प्रत्येक राजकीय पक्षांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनीही त्यांच्या विभागामध्ये बचतगटांची निर्मिती केली आहे. महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतला असला तरी निवडणुकांमध्ये अनेक उमेदवार याकडे प्रलोभन दाखविण्याची संधी म्हणूनही पाहत आहेत. येणाऱ्या निवडणुकांमध्येही अशाप्रकारे प्रलोभन दाखविले जाण्याची शक्यता



असल्यामुळे निवडणूक विभागाने दक्षता घेण्यास सुरुवात केली आहे. रायगड जिल्हाधिकाऱ्यांनीही बचतगटांसह, जनधन खात्यांवर अचानक जमा झालेल्या पैशांवरही लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ठाणे जिल्ह्यामध्येही अशाप्रकारे यंत्रणा सक्रिय केली जात आहे. भरारी पथकांना त्याविषयी सूचना देण्यात आल्या आहेत. या कालावधीमध्ये अनपेक्षितपणे जमा होणाऱ्या पैशांची चौकशी केली जाणार आहे.

# खाडीला कचराकुंडीचे स्वरूप

**ठाणे** - ठाणे शहरातील खाडीकिनाऱ्यांच्या सुशोभीकरणासाठी महापालिका कोटय़वधी रुपयांच्या खर्चाचे प्रकल्प आखत असताना, पूर्वेकडील मीठबंदर खाडीकिनाऱ्याला मात्र कचराकुंडीचे रूप आले आहे. निर्माल्य भरलेल्या प्लास्टिक पिशव्या, हॉटेलांमधील उर्वरित अन्न आणि कचरा खाडीत बिनदिक्कत टाकला जात आहे. हा कचरा तिवरांमध्ये अडकून पडत असून त्यामुळे तेथील जैवविविधता धोक्यात आली आहे. ठाणे पूर्वेकडील कोपरी परिसरातील मीठबंदर खाडी भाग हा शहराच्या एका कोपऱ्यात आहे. वर्दळ कमी असल्यामुळे आणि विविध प्रकारचे वृक्ष असल्यामुळे इथे अनेक प्रजातींच्या पक्ष्यांचा अधिवास आहे. सकाळी आणि सायंकाळी इथे फेरफटका मारण्यासाठी व व्यायामासाठी स्थानिक रहिवासी येतात. मात्र गेल्या काही महिन्यांपासून खाडीतील पाण्यात निर्माल्य आणि अन्य कचरा टाकण्याचे प्रमाण वाढल्याचे या परिसरातील रहिवाशांचे म्हणणे आहे. खाडीत निर्माल्य टाकले जाऊ नये म्हणून महापालिकेने काही महिन्यांपूर्वी येथे ठेवलेले मोठे निर्माल्य कलशही नाहीसे झाले आहेत. निर्माल्याचे विघटन होत असले तरी ते ज्या प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये बांधून टाकले जाते, त्या पिशव्या कांदळवनांमध्येच अडकून राहतात. खाडीत गणेशमूर्तीचे विसर्जन केले जाते. त्यामुळे मूर्तीचे काही भाग किनाऱ्यावर आलेले दिसतात.

# मनसेची मते कोणाला मिळणार?

गेली १० वर्षे १५८ जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदार संघ हा शिवसेनेकडे आहे. राज्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री रवींद्र वायकर हे या मतदार संघाचे २००९ पासून प्रतिनिधित्व करतात. विधानसभा असो की लोकसभा मतदारांनी शिवसेनेला साथ दिली आहे. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघातून मोदी लाटेत विद्यमान खासदार गजानन कीर्तिकर यांना ४२ हजार ६३२ ची आघाडी येथून मिळाली होती. महायुतीचे गजानन कीर्तिकर यांना ८५ हजार ३६२ तर त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे गुरुदास कामत यांना ४२ हजार ७३० इतकी मते मिळाली होती. २००९च्या लोकसभा निवडणुकीत कामत यांनी यांनी कीर्तिकर यांचा पराभव केला होता. त्याची परतफेड २०१४च्या लोकसभा निवडणुकीत कीर्तिकर यांनी केली होती.

लोकसभा निवडणुकीनंतर २०१४च्या विधानसभा निवडणुकीत शेवटच्या क्षणाला युती तुटली आणि शिवसेना व भाजपा एकमेकांच्या विरोधात लढले. या निवडणुकीत गृहनिर्माण राज्यमंत्री रवींद्र वायकर यांनी



भाजपाच्या उज्वला मोडक यांचा २८ हजार ९६२ मतांनी पराभव केला होता. २००९च्या विधानसभा निवडणुकीत रवींद्र वायकर यांना ६४ हजार ३१८ तर काँग्रेसचे भाई जगताप यांना ५० हजार ५४३ तर मनसेच्या संजय चित्रे यांना २६ हजार ९३४ मते मिळाली होती. वायकर यांनी जगताप यांचा १३ हजार ७७५ मतांनी पराभव केला होता.

# आश्वासनं अपूर्ण, मोदींनी विश्वासघात केला

*नवी दिल्ली - काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केलाय. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यात आणि २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत दिलेली आश्वासनं पूर्ण करण्यात पंतप्रधान मोदी अपयशी ठरलेत. आणि आता भीतीचं वातावरण निर्माण करून मोदी जनतेचा विश्वासघात करत आहेत, असा आरोप राहुल गांधी यांनी केलाय.*




पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीतून राहुल गांधींनी मोदींवर टीकास्त्र सोडले. नरेंद्र मोदी हे पंतप्रधान कमी आणि 'पब्लिसिटी मिनिस्टर' जास्त आहेत. तसंच मोदींच्या वर्तणुकीतून सतत अहंकार झळकतो, असं राहुल गांधी म्हणाले. पंतप्रधान होणार का?, यावर भाष्य करणं योग्य नाही. हा आततायीपणा ठरेल. याचा निर्णय जनतेलाच घेऊ द्या, असं राहुल गांधी यांनी स्पष्ट केलं. पंतप्रधान कार्यालयाद्वारे प्रसार माध्यमांवर दबाव आणण्याचं काम केलं जातंय. पण पंतप्रधान मोदी मूळ मुद्दे बदलू शकत नाहीत. मोदी अहंकारी आणि सत्तेसाठी हपापले आहेत. देशाचे सर्वच प्रश्न किंवा समस्या फक्त आपणच सोडवू शकतो, असं ते स्वतःच मिरवत आहेत. कोणाचा सल्ला घेण्याची तसदीही ते घेत नाहीत, असा घणाघात राहुल गांधींनी केलाय.

मोदी स्वतः भ्रष्ट आहेत. देशात बेरोजगारी वाढलीय. अर्थव्यवस्था आणि शेतकरी बिकट स्थितीत आहेत. स्वायत्त संस्था खिळखिळ्या केल्या आहेत. जनतेत जातीय द्वेष पसरवल्याने हिंसक घटना वाढल्या. दलितांच्या हक्कांवर गदा आणली गेली, असे गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केलेत.

प्रत्येकाच्या बँक खात्यात १५ लाख रुपये जमा करू. परदेशात असलेला ८० लाख कोटींचा काळा पैसा भारतात आणू. देशात १०० स्मार्ट सिटी उभारू आणि २ कोटी रोजगार निर्मिती करू, अशी अनेक खोटी आश्वासनं पंतप्रधान मोदींनी २०१४च्या लोकसभा निवडणुकीत दिली होती. हे निवडणुकीतील प्रचाराचे प्रमुख मुद्दे असतील, असं राहुल गांधी यांनी सांगितलं.

# देशात सध्या एकच नाव, मोदी मोदी मोदी

**गांधीनगर-** 'निवडणुकीनंतर देशाचे नेतृत्व कोण करणार याच मुद्द्यावर यंदाची लोकसभा निवडणूक लढवली जात आहे आणि हिमाचल ते कन्याकुमारी, कामरूप ते गांधीनगरपर्यंत फक्त एकच नाव मला ऐकू येतेयष्ठते म्हणजे मोदीष्ठमोदीष्ठमोदीष्ठ' अशा शब्दांत भाजपा अध्यक्ष अमित शहा यांनी शनिवारी अहमदाबाद येथे आयोजित सभेमध्ये मोदींवर स्तुतिसुमने उधळली. गांधीनगर मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी शहा या सभेत बोलत होते. गेली ७० वर्षे देशातील जनता ज्या नेत्याची प्रतीक्षा करत होती तो त्यांना नरेंद्र मोदी यांच्यामध्ये आढळला आहे असे शहा म्हणाले. देशातील विविध ठिकाणी आपण भेटी दिल्या तेव्हा तेथील लोक हे देशाचे नेतृत्व करण्यासाठी मोदी यांच्याच नावाचा उच्चार करत



होते असे ते म्हणाले. लालकृष्ण आडवाणी, अटलबिहारी वाजपेयी आणि पुरुषोत्तम गणेश मावळंकर यांच्यासारख्या नेत्यांनी प्रतिनिधित्व केलेल्या गांधीनगर मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरतोय हे आपले भाग्यच आहे असे शहा म्हणाले.

पाकिस्तानचे तुकडे केले म्हणून इंदिरा गांधी यांना श्रेय दिले जाते, मग बालाकोट सर्जिकल स्ट्राइकचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी का घेऊ नये असा सवाल केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी शनिवारी केला.

'१९७१ मध्ये पाकिस्तानचे दोन तुकडे करण्याचा पराक्रम आपल्या लष्कराने केला होता. बांगलादेशची निर्मिती झाली होती. त्या युद्धानंतर आमचे नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी इंदिरा गांधींचे अभिनंदन केले होते.

# दाभोलकर-पानसरेंचे मारेकरी सापडत नसतील तर एकट्या मुख्यमंत्र्यांचा काय दोष?

**मुंबई-** आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी युतीची घोषणा झाल्या दिवसापासून शिवसेनेचा भाजपविरोधातील सूर कमालीचा मवाळ झाला आहे. युती होण्यापूर्वी शिवसेना भाजपवर कुरघोडी किंवा टीका करण्याची एकही संधी सोडत नसे. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'तील अग्रलेखांमधून तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजप नेत्यांवर अक्षरशः आगपाखड व्हायची. यावरून भाजपमधील अनेक नेते नाराजही झाले होते. मात्र, आता युती झाल्यानंतर शिवसेनेचे वेगाने होत असलेले मनपरिवर्तन पाहून राजकीय वर्तुळातील अनेकजण तोंडात बोटे घालत आहे. नरेंद्र दाभोलकर आणि कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्याप्रकरणाचा छडा लावण्यात आलेल्या अपयशावरून उच्च न्यायालयाने नुकतीच मुख्यमंत्र्यांची कानउघडणी केली होती. मात्र, दाभोलकर व पानसरेंचे मारेकरी सापडत नसतील तर एकट्या मुख्यमंत्र्यांना का जबाबदार धरता, असा सवाल उपस्थित करत शिवसेनेने फडणवीसांची बाजू उचलून धरली आहे. 'सामना'तील या अग्रलेखात न्याय प्रक्रियेतील दिरंगाईबद्दलही अप्रत्यक्षपणे भाष्य करण्यात आलेय. फक्त पानसरे-दाभोलकरच नाहीत, तर लाखो गरीब आजही न्यायापासून वंचित आहेत व कोर्टाच्या पायऱ्या झिजवून त्यांचे आयुष्य संपले. पण त्यांना न्याय काही मिळाला नाही. मात्र म्हणून आमची न्यायालये बधिर




किंवा अकार्यक्षम आहेत असा आरोप आम्ही करणार नाही. गरीबांना न्याय मिळत नाही व अनेकांना न्याय विकत मिळतो या भ्रमातून जनतेला बाहेर काढले नाही, तर न्यायव्यवस्थेवरील विश्वासाला तडे जातील व देशाला ते परवडणारे नाही. हे सर्व करण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची नाही, अशी भूमिका या अग्रलेखातून मांडण्यात आली आहे.

# जॉन्सन एन्ड जॉन्सन 'बेबी केअर शॅम्पू'मुळे कॅन्सरचा धोका, बाजारातून परत मागवले

**जयपूर- प्रत्येक आई-वडील आपलं बाळ सुदृढ राहावं आणि प्रत्येक धोक्यापासून दूर राहावं यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करत असतात. यासाठी आपल्या खिशाला देता येईल तेवढा ताण देऊन जगातली चांगल्यातली चांगली गोष्ट आपल्या बाळासाठी उपलब्ध करून देतात. यासाठी ते प्रत्येक प्रोडक्टची निवड विचारपूर्वक आणि काळजीपूर्वक करतात.**

पण, तुम्ही ज्या कंपन्यांवर विश्वास टाकून त्यांचे प्रोडक्ट खरेदी करत आहात त्या कंपन्या तुमचा विश्वासघात तर करत नाहीत ना? लहान बाळांसाठीच्या प्रोडक्टससाठी ओळखल्या जाणाऱ्या 'जॉन्सन एन्ड जॉन्सन' ही कंपनी पुन्हा एकदा वादात अडकलीय. 'जॉन्सन एन्ड जॉन्सन' ही कंपनी हिमाचल प्रदेशात 'बद्दी'मध्ये अनेक उत्पादन तयार करते. या कंपनीच्या बेबी शॅम्पूच्या तसापणीत काही हानिकारक तत्व आढळलेत. या बेबी शॅम्पूचा बॅच क्रमांक - बीबी ५८१७७ आणि बीबी ५८२०४ असा आहे. यानंतर, राजस्थानमधील सर्व ड्रग्ज कंट्रोल अधिकाऱ्यांना या ड्रग्ज बुलेटिनबद्दल माहिती देण्यात आलीय. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बेबी शॅम्पूच्या दोन्ही बॅच मानकांवर फोल ठरल्यात. त्यामुळे खरेदीदारांसाठी ही उत्पादनं हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे कंपनीच्या या उत्पादनांची विक्री रोखत ते बाजारातून परत मागवण्यात आलेत. 'जॉन्सन एन्ड जॉन्सन'च्या 'बेबी केअर शॅम्पू'मध्ये हानिकारक असे फार्मेल्डिहाइड असल्याचं अहवालात म्हटलं गेलंय.



फार्मेल्डिहाइडमुळे कॅन्सरचा धोका वाढतो. बीबी ५८१७७ आणि बीबी ५८२०४ या बॅचचा बेबी शॅम्पू बाजारात विक्रीसाठी जाऊ नये आणि त्याला ताबडतोब बाजारातून हटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. २०१८ मध्ये अमेरिकेत काही महिलांमध्ये जॉन्सन एन्ड जॉन्सन बेबी पावडरमुळे ओवेरियन (गर्भाशय) कॅन्सरचे लक्षण आढळले होते. महिलांचे दावे कोर्टात सिद्ध झाल्यानंतर कोर्टानं २२ पीडित महिलांना ४.६९ अरब डॉलरची नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले होते. त्यापूर्वी १९८२ मध्येही जॉन्सन एन्ड जॉन्सनच्या एका औषधामुळे काही जणांचा मृत्यू झाला होता.

# पुण्यात आता डुप्लिकेट 'शिवशाही' बसचा गोंधळ

**पुणे–** पुण्यात खासगी बसचालकांनी चक्क 'शिवशाही' बसची कॉपी केल्याची माहिती समोर आली आहे. एसटी महामंडळाची 'शिवशाही' बस सध्या जोरात सुरु आहे, त्यामुळे ट्रॅव्हल्स व्यावसायिकांचे नुकसान होत आहे. लोकांची पसंती खाजगी ट्रॅव्हल्स पेक्षा एसटी महामंडळाच्या 'शिवशाही' बसला नागरिकांची जास्त पसंती असल्याने व्यवसायिकांनी एक शक्कल लढवली आणि डुप्लिकेट 'शिवशाही' बस आणली. स्पर्धेत टिकण्यासाठी एसटी महामंडळाने ताफ्यात शिवनेरी, अश्वमेध आणि हिरकणी सारख्या वातानुकुलित आणि आरामदायी बसेस नागरिकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. डुप्लिकेट 'शिवशाही चा प्रकार लक्षात येताच एसटी महामंडळाच्या मुख्य कार्यालयाने गंभीर दखल घेतली. अशा व्यवसायिकांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असा इशारा देखील महामंडळाने दिला आहे.



# गुरूच्या गावाला जाण्याचा शिष्याने दिवस ठरवला!

**मुंबई-** गुरूचं बोट धरून राजकारणात आलेला शिष्य गुरूच्याच बालेकिल्ल्यात १० एप्रिल रोजी शड्डू ठोकणार आहे. खुद्द पंतप्रधान मोदी राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात येणार आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघाच्या भाजपच्या उमेदवार कांचन कुल यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी बारामतीमध्ये येणार आहेत. महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीवेळी मोदी बारामतीत आले होते त्यावेळी त्यांनी पवारांवर सडकून टिका केली होती. दरम्यान, बारामती लोकसभा मतदारसंघासाठी सत्ताधारी पक्षाने आणि विरोधकांनी प्रतिष्ठा पणाला लावल्याचं दिसून येत आहे.



# लोकसभेचा निकाल सहा दिवस उशिरा लागण्याची शक्यता

**नवी दिल्ली- ईव्हीएमच्या तुलनेत व्हीव्हीपॅटची संख्या वाढविण्याची मुळीच गरज वाटत नाही. त्याचप्रमाणे व्हीव्हीपॅटवरील स्लिप मोजण्याची प्रचलित पद्धत सर्वात सुलभ आणि योग्य आहे. त्यावर आक्षेप घेण्यासारखे काहीच नसल्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हटले आहे.**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील २१ विरोधी पक्षांनी, व्हीव्हीपॅट मशिनवरील किमान ५० टक्के स्लिप मोजल्या गेल्या पाहिजेत, अशी मागणी केली होती. विरोधकांच्या मागणीप्रमाणे व्हीव्हीपॅटवरील ५० टक्के स्लिपची मोजणी करायचे ठरल्यास निकाल जाहीर होण्यास किमान सहा दिवस लागतील, असे आयोगाने शुक्रवारी




सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. २१ पक्षांच्या वतीने दाखल केलेल्या याचिकेत व्हीव्हीपॅटची संख्या वाढविण्याची आणि किमान ५० टक्के स्लिप मोजण्याची मागणी करण्यात आली होती. त्यावर आयोगाने आपली बाजू मांडणारे हे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. व्हीव्हीपॅटची संख्या वाढविण्याची गरज वाटत नसल्याचे आयोगाने म्हटले आहे. त्यावरील स्लिप मोजण्याची सध्याची प्रचलित पद्धतच सर्वात योग्य आहे. त्यात बदल करण्याची तर मुळीच गरज नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

निवडणुका खुल्या वातावरणात व्हाव्यात, यासाठी काही मार्गदर्शक सूचना आल्या तर त्याचा आयोग निश्चितपणे विचार करेल. मात्र, व्हीव्हीपॅट मशिन्स, त्यांची संख्या, त्यावरील स्लिप मोजण्याची पद्धत या सर्वांचा बारकाईने अभ्यास करूनच त्यावर निर्णय घेतला गेला आहे, असेही आयोगाने आपल्या या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

विरोधकांची याचिका दाखल करून घेताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, आपल्या कामकाजात सुधारणा करण्याचा प्रयत्न सर्वांनीच करायला हवा. निवडणूक आयोगही त्यापासून स्वतःला वेगळे ठेवू शकत नाही. न्यायालयाच्या या टिपणीनंतर आयोगाने प्रतिज्ञापत्र सादर करून, आपली भूमिका स्पष्ट केली.

# मोदी सरकारची डोकेदुखीः वर्षभरात ८.५९ लाख कोटींचा महसुली तोटा

**नवी दिल्ली-** देशाचा महसुली तोटा फेब्रुवारी २०१९ च्या अखेरीपर्यंत संपूर्ण वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुमानाच्या १३४.२ टक्केंवर पोहोचला आहे. याप्रकरणी प्रसिद्ध झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार वृद्धी कमी राहिल्याने महसुली तोटा वाढला आहे. लेखा महानियंत्रकांच्या सीजीए आकडेवारीनुसार एप्रिल-फेब्रुवारी २०१८-१९ मध्ये महसुली तोटा ८.५१ लाख कोटी रूपये राहिला. दरम्यान, सरकार महसुली तोट्याला सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या जीडीपी ३.४ टक्क्यांपर्यंत रोखण्यास प्रतिबद्ध असल्याचे आर्थिक प्रकरणांचे सचिव एस सी गर्ग यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे. आकडेवारीनुसार केंद्र सरकारची महसुली कमाई ही १२.६५



लाख कोटी होती. जी संशोधित अंदाजपत्रकाच्या ७३.२ टक्के आहे. यापूर्वी मागील आर्थिक वर्षाच्या समान कालावधी महसूल अंदाज ७८.२ टक्के होता. सरकारचे कर उत्पन्न १०.९४ लाख कोटी रुपये आणि बिगर कर महसूल १.७ लाख कोटी रुपये राहिला. एप्रिल-फेब्रुवारी, २०१८-१९ या कालावधीत सरकारचा एकूण खर्च २१.८८ लाख कोटी रुपये अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ८९.०८ टक्के राहिला. यामध्ये १९.१५ लाख कोटी रुपये महसूल तर २.७३ लाख कोटी रुपये जमा खात्याचे होते. यादरम्यान अर्थ मंत्रालयाने निवेदन प्रसिद्ध करून फेब्रुवारीपर्यंत केंद्र सरकारने राज्यांना करामध्ये त्यांच्या हिश्श्याअंतर्गत ५.९६ लाख कोटी रुपये हस्तांतरित केले आहेत.

# लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर

**मुंबई-** चार टप्प्यातल्या मतदानासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सजग नागरिकांनो, आधी मतदान करून मगच लुटा सुट्टीचा आनंद, असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे. मतदारांनो, ऐका हो ऐका. पाच वर्षांनी मिळणार संधी. संधी जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीउत्सवात सहभागी होण्याची आहे. संधी तुमचा राजा ठरवण्याची आहे. ही संधी वाया घालवू नका. मतदारांनी मतदान करावं म्हणून राज्यात ११ एप्रिल १८ एप्रिल, २३ एप्रिल आणि २९ एप्रिलला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. अर्थात चारही दिवस सरसकट सुट्टी नाही. तर ज्या दिवशी मतदान आहे, त्या भागात फक्त त्या दिवशीच सुट्टी मिळणार आहे. पण महत्त्वाचं म्हणजे १८ एप्रिल या मतदानाच्या तारखेआधी १७ एप्रिलला महावीर जयंती आहे. तर १९ एप्रिलला गुड फ्रायडेची सुट्टी आहे आणि त्यानंतर शनिवार रविवार आहे. तर २९ एप्रिलला सोमवार आहे. त्याच्या आधी शनिवार-रविवार आहे. १८ आणि २९ एप्रिल या दोन मतदानाच्या तारखा सुट्ट्यांना लागून आहेत. त्याचदरम्यान शाळा-महाविद्यालयांच्या सुट्ट्याही सुरू होत आहेत.



पण कृपया बाहेर फिरायला जायचं मतदानाच्या तारखांदरम्यान ठरवू नका. मतदानाची सुट्टी ही मतदानासाठी आहे. सहलीसाठी नाही. महाबळेश्वर, गोवा, केरळ, सिमला-कुलू मनाली, अगदी युरोप. ही सहलीची ठिकाणे आहे तिथेच राहणार आहेत. तिथं कधीही जाता येईल. पण पाच वर्षांनी एकदा येणारा मतदानाचा मुहूर्त चुकवलात तर मात्र पुढची पाच वर्षं तुम्हाला कोणालाही बोलण्याचा अधिकार राहणार नाही.

# ईशान्य मुंबईत मला उभे करा; काँग्रेस-राष्ट्रवादीचा पराभव करेन


**नवी दिल्ली-** भाजपचे विद्यमान खासदार किरीट सोमय्या यांच्या उमेदवारीवरुन भाजप- शिवसेना युतीमधील वाद अद्याप मिटलेला नाही. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते रामदास आठवले यांनी ईशान्य मुंबई मतदारसंघाची जागा आपल्याला सोडावी, अशी मागणी केली आहे. असे केल्यास युतीतील वाद मिटेल. तसेच मी येथे काँग्रेस- राष्ट्रवादी आघाडी उमेदवारीचा पराभव करेन, असाहा दावा त्यांनी केला आहे. भाजपने किरीट सोमय्या यांना तिकीट दिले, तर आपण स्वतः ईशान्य मुंबई मतदार संघातून निवडणूक लढवू, असा इशारा शिवसेनेचे विक्रोळीचे आमदार सुनील राऊत यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना आठवले यांनी, ईशान्य मुंबईतून लढण्यासाठी आपण तयार आहे. या मतदारसंघातील लोक मला चांगले ओळखतात. याआधी मी येथून निवडणूक लढविली होती; त्यावेळी मला २.२५ लाख मते मिळाली होती, असेही आठवले यांनी म्हटले आहे.

# पवार-फडणवीसांची माढ्यात प्रतिष्ठा पणाला!

**माढा- माढा लोकसभा मतदारसंघातील भाजपचा उमेदवारीचा तिढा अखेर सुटला असून अनेक नावांवर काथ्याकूट होऊन अखेर फलटणचे रणजितसिंह-नाईक-निंबाळकर यांना भाजपकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यांची लढत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष संजय शिंदे यांच्याशी होईल. खरेतर ही लढत आता माढा लोकसभा मतदारसंघात समविचारी आघाडी स्थापन करणाऱ्या दोन मित्रांमध्येच होणार आहे.**



या लढतीसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे. फलटणचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी नुकताच काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला आहे. यापूर्वी ते सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांचे वडील हिंदुराव नाईक-निंबाळकर सातारा शिवसेनेचे माजी खासदार आहेत. ते राष्ट्रवादीचे नेते, विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांचे कट्टर विरोधक आहेत. माढा लोकसभा मतदारसंघातील समविचारी आघाडीचे ते घटक आहेत. राष्ट्रवादीचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी माढ्यातून उमेदवारीची घोषणा केल्यानंतर हा मतदारसंघ देशात हायप्रोफाईल बनला होता. या मतदारसंघातून पवार यांनी २००९ ची लोकसभा निवडणूक लढवून ती सुमारे सव्वातीन लाख इतक्या मताधिक्याने जिंकली होती. खा. शरद पवार यांनी येथून लढण्यास तयार असल्याचे त्यांनी पिंपळनेर येथे कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात जाहीर केले होते. त्यानंतर त्यांनी मावळ येथून नातवाच्या उमेदवारीने कुटुंबातील कितीजणांनी निवडणुकीत लढायचे, असे कारण पुढे करत याठिकाणाहून माघार घेतली होती. त्यांच्या माघारीचे कारण या मतदारसंघात त्यांच्याविषयी असलेली नकारात्मक भावना आहे, असेही काहीकाळ चर्चिले गेले. शरद पवारांच्या माघारीनंतर याठिकाणी राष्ट्रवादीचे विद्यमान खा. विजयसिंह मोहिते-पाटील यांचे नाव आघाडीवर होते.




## आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)